भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(दुपार)

जा.क्र. १४२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २६/०२/२०१७

**१) घराचा दाराचा कुलुप तोडुन आलमारीतुन सोन्या, चांदीचे दागीने व सामानाची चोरी . :—**

दिनांक ०५/०२/२०१७ वा. १०.०० ते २५/०२/२०१७ १७.११ वा. दर. यातील फिर्यादी वसंता पांडुरंग येळणे वय ६३ वर्ष, रा. उज्वल नगर मुरमाडी यांनी घराला कुलुप लावुन पत्नीचे उपचारा कामी नागपुर येथे गेला असता कोणी तरी अज्ञात चोरानेसुना मौका पाहुन समोरील दाराचा ताला तोडुन आत प्रवेश करुन घरातील गोदरेज आलमारी मध्ये ठेवलेल्या २ सोण्याच्या अंगठया १० ग्रॅम, चांदीचे ४ सीक्के १० ग्रॅम, १०/—रु. चे ७० सीक्के, २१ नवीन साडया असा एकुण ३१,७००/—रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ४५४,४५७,३८० भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. टेंभुर्णे पोस्टे लाखनी हे करीत आहेत.

**२) मोटार सायकल चालाकंच्या निष्काळजीपणामुळे दोघांचा मृत्यु . :—**

दिनांक २५/०२/२०१७ चे १८.३० वा. दरम्यान यातील आरोपी मृतक धनराज वरछो वय २४ वर्ष, रा. दसुरटोला जिल्हा गोंदीया हा आपले साथीदारा सोबत मोटार सायकलने विरली बु. वरुन करांडलाकडे राज्य मार्ग क्र. ३५४ ने डबल सीट जात असता मृतकने आपल्या ताब्यातील मोटार सायकल भरधाव वेगाने व हयगयीने, निष्काळजीपणे चालवुन त्याचे मोटार सायकल वरील नियंत्रण सुटल्याने मोटार सायकल रोडच्या बाजुला असलेल्या बाभळीचे झाडाला धडक देवुन अपघात झाल्याने स्वत:चे व साथीदार रामसींग वय ३० वर्ष, रा. कोरची याचे मरणास कारणीभुत झाल्याने स्टे. डा. साना क्र. १९/१७ दिनांक २५/०२/२०१७ चे चौकशी अहवाला वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम २७९,३०४(अ) भांदवी. सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. भोयर पोलीस स्टेशन लाखांदुर हे करीत आहे.

**३) मॅक्स गाडीचे चालकांच्या निष्काळजीपणामुळे मोटार सायकल चालकास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २५/०२/२०१७ चे १९.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी मुकेश देवराम वैरागडे वय २६ वर्ष, रा. मोहदुरा ह. मु. भंडारा हा स्वत:चे गाव मोहदुरा येथुन डांबरी रोडने गायमुख येथे यात्रा बंन्दोबस्ताकरीता आपले मोटार सायकल ने आंधळगाव मार्गे जात असतांनी चीचोली येथे समोरुन येणाऱ्या सील्वर रंगाच्या चारचाकी मॅकस गाडीचे आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने हयगयीने, लापवाहीने व निष्काळजीपणे चालवुन रॉग साईडला आणुन फिर्यादीचे मोटार सायकलला चालकास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम २७९,३३७ भांदवी. सहकलम १८४,१३४ अ.ब/१७७ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. उईके पोलीस स्टेशन आंधळगाव हे करीत आहे.

४) महीलेचा शेतात पडुन अडखडुन मृत्यु . :-

दिनांक २४/०२/२०१७ रोजी १६.०० वा. ते २५/०२/२०१७ चे ०७.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी महाल्पी मृतक श्रीमती पारबताबाई दौलत मांढरे वय ७० वर्ष, गडेगाव ही शेतशिवारात बोरी वेचण्यास गेली होती ती डोक्यावर बोरीची चुंगडी मांडुन कमाने यांचे शेतातुन जाणे येण्याचे रस्त्याने घरी येत असता पाय अडखडुन पडुन मरण पावलेल्या स्थितीत मिळुन आल्याने फिर्यादी शरद दलपत मांढरे वय २९ वर्ष, रा. गडेगाव यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. थेर पो.स्टे. लाखनी हे करीत आहे.

५) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :-

दिनांक २५/०२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली ६२ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०३, त्यापैकी तीन सिटर वाहनांवरती ०९ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ५० केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(एस. व्ही. कुलकर्णी )
**प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)**
**भंडारा**
**दुरध्वनी.क्र. ९९८७३८८५४०५**

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.